// सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

फोन ०२०-२५६०१२१६
फॅक्स ०२०-२५६०१२०६
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे – ४११ ००७
email : st-law@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/विधी/ 1791

दि. १७.१०.२०१६

प्रति,
मा. प्राचार्य/वरिष्ठ पर्यवेक्षक,
सर्व संलग्न विधी महाविद्यालये,
ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१६ (सर्व परीक्षा केंद्रे)

विषय : केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी सीलबंद उत्तरपत्रिका आणून देण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम...
एल.एल.एम. परीक्षा ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१६

महोदय/महोदया

वर नमूद केलेल्या परीक्षा मंगळवार, दिनांक १८.१०.२०१६ पासून सुरु होत आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन खाली नमूद केलेल्या केंद्रावर केंद्रिय मूल्यमापन पध्दतीने होणार आहे.

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | प्रकल्प केंद्राचे नाव व पत्ता | प्रकल्प केंद्राच्या संचालकाचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १.<br>२. | एल.एल.एम. (Rev. 06-07)<br>एल.एल.एम. (Rev. 2014) | मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे | मा. प्राचार्य क्रांती देशमुख<br>कार्यालय दूरध्वनी क्रमांक – ०२०-२५६६५७२९<br>मो. ९९२२४१८९१२ |

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ कलम ७२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, परीक्षेचा निकाल ठराविक मुदतीत जाहीर होणे आवश्यक आहे. परीक्षेचा निकाल ठराविक मुदतीत जाहीर होण्यासाठी केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होणे क्रमप्राप्त असल्याने ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०१६ मध्ये होणा-या परीक्षांच्या उत्तरपत्रिका केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प केंद्रावर जमा करण्यासाठी आखलेल्या योजनेची अंमलबजावणी प्रत्येक परीक्षा केंद्रप्रमुखांनी करावयाची आहे. उत्तरपत्रिका केंद्रावर जमा करण्याची योजना पुढे नमूद केल्याप्रमाणे निश्चित केली आहे.

१. दररोज ज्या ज्या विषयांची परीक्षा होईल त्या त्या विषयांच्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकाप्रमाणे (ब्लॉकप्रमाणे) लावून घ्याव्यात. प्रत्येक ब्लॉकच्या कनिष्ठ पर्यवेक्षकांच्या अहवालामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील आसन क्रमांक व उत्तरपत्रिकेवरील आसन क्रमांक बरोबर असल्याची खात्री करुन बिनचूक व सुवाच्च अक्षरांमध्ये सदर अहवाल असावा. या अहवालाला विशेष महत्व आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या संशयाला जागा राहू नये, याची काळजी घ्यावी. त्या सर्व उत्तरपत्रिकांचे गठ्ठे विभागवार बांधून ते सर्व गठ्ठे सीलबंद करुन ठेवावेत. कोणत्याही परिस्थितीत दोन वेगवेगळया विषयांच्या उत्तरपत्रिका एकाच गठ्ठयात बांधू नयेत.

२. परीक्षा झाल्यानंतर लगेचच जर सदरचे गठ्ठे सीलबंद करण्यात आले नाहीत, तर काही गैरसमज होण्याची शक्यता असते. त्यासाठी विशेष काळजी घेणे जरुरीचे आहे. सीलबंद केलेल्या गठ्ठयांवर खालीलप्रमाणे माहिती नमूद करावी.

१. परीक्षा केंद्राचे नाव
२. परीक्षेचे नाव
३. विषयाचे नाव
४. विभाग क्रमांक
५. परीक्षा दिनांक व वेळ
६. उत्तरपत्रिकांची संख्या

परीक्षा सुरु झाल्यानंतर सीलबंद केलेले उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधींमार्फत संबंधित मा. संचालक, केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प यांच्याकडे वेळच्या वेळी आणून देण्याची व्यवस्था करावी व त्याची पोहोच पावती घ्यावी.

| परीक्षेचे नाव | परीक्षेचा दिनांक | अहमदनगर, नाशिक व संगमनेर उपकेंद्रावर गाडीच्या उपलब्धतेचा तक्ता | |
|---|---|---|---|
| | | दिनांक व वार | वेळ |
| एल.एल.एम. (Sem I to IV) | १८.१०.२०१६ ते २०.१०.२०१६ | २१.१०.२०१६ शुक्रवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| एल.एल.एम. (Sem I to IV) | २१.१०.२०१६ ते २५.१०.२०१६ | २६.१०.२०१६ बुधवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| एल.एल.एम. (Sem I to IV) | २६.१०.२०१६ ते २७.१०.२०१६ | ०२.११.२०१६ बुधवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| एल.एल.एम. (Sem I to IV) | ०४.११.२०१६ ते ०५.११.२०१६ | ०७.११.२०१६ सोमवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| एल.एल.एम. (Sem I to IV) | ०८.११.२०१६ ते १०.११.२०१६ | ११.११.२०१६ शुक्रवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| एल.एल.एम. (Sem I to IV) | ११.११.२०१६ ते १२.११.२०१६ | १५.११.२०१६ मंगळवार | सकाळी ८.०० ते ११.०० |
| एल.एल.एम. (Sem I to IV) | १५.११.२०१६ | १८.११.२०१६ शुक्रवार | सकाळी ८.०० ते ११.०० |

३. पुणे शहर व पुणे जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रांनी एल.एल.एम. (Sem I to IV) सर्व परीक्षांच्या सीलबंद उत्तरपत्रिका वर नमूद केलेल्या संबंधित केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी दुपारी १२.०० ते ४.०० या वेळेत प्रत्येक विषयाची परीक्षा संपल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत पोहोचते करावेत व त्याची पोहोच पावती घ्यावी.

४. नाशिक शहर व जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रांनी वर नमूद केलेल्या परीक्षांच्या सीलबंद उत्तरपत्रिका वरील वेळापत्रकाप्रमाणे विद्यापीठाच्या नाशिक येथील विभागीय कार्यालय इमारत, तिसरा मजला, नाशिक – ४२२ ००२ येथे दुपारी १२.०० ते ४.०० या वेळेत प्रत्येक विषयाची परीक्षा संपल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत पोहोचते करावेत.

५. अहमदनगर शहर व जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रांनी सीलबंद उत्तरपत्रिका वरील वेळापत्रकानुसार विद्यापीठाच्या अहमदनगर येथील विभागीय कार्यालयात दुपारी १२.०० ते दुपारी ४.०० या वेळेत पोहोचते करावयाचे आहेत. (विभागीय कार्यालय, न्यू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर)

६. अहमदनगर जिल्हयातील अकोले, संगमनेर, कोपरगाव व राहता या तालुक्यातील सर्व परीक्षा केंद्रांनी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे वरील वेळापत्रकानुसार मा. प्राचार्य, संगमनेर, नगरपालिका कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य आणि ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर यांचेकडे पोहोचते करावयाचे आहेत.

परीक्षेच्या केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पांचे समन्वयक आणि सहाय्यक समन्वयक खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| समन्वयक | १.डॉ. पी. व्ही. कुलकर्णी, उपकुलसचिव (परीक्षा) | १. एल.एल.एम. (Sem I to IV)<br>२. एल.एल.एम. (Rev. 2014) |
| सह.समन्वयक | १. श्री. एस. डी. डावखर, सहाय्यक कुलसचिव | १. एल.एल.एम. (Sem I to IV)<br>२. एल.एल.एम. (Rev. 2014) |
| | १. श्री. मेघशाम लोखंडे, सहाय्यक कक्षाधिकारी | २. एल.एल.एम. (Sem I to IV)<br>३. एल.एल.एम. (Rev. 2014) |

केंद्रिय मूल्यमापन प्रकल्पाचे काम सुरळीत सुरु होवून नियोजित वेळेत होण्याच्या दृष्टीने उत्तरपत्रिकांचे गठ्ठे नियोजित ठिकाणी व नियोजित वेळेत येणे आवश्यक असल्यामुळे सर्व परीक्षा केंद्रांनी व विद्यापीठ उपकेंद्रांनी वरील योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे.

आपला,

उपकुलसचिव,
(परीक्षा)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. संचालक/मा. प्राचार्य क्रांती देशमुख, मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे केंद्रिय मूल्यमापन प्रकल्प, एल.एल.एम.
२. मा. वित्त व लेखा अधिकारी
३. उपकुलसचिव, (परीक्षा – छाननी व तालिनीकरण)
४. उपकुलसचिव (परीक्षा - बारकोड)
५. सहाय्यक कुलसचिव (परीक्षा विभाग)
६. उपकुलसचिव, गृहव्यवस्थापन विभाग – पत्रात नमूद केल्याप्रमाणे अहमदनगर आणि नाशिक उपकेंद्रासाठी एक वाहन त्या त्या दिनांकास उपलब्ध करण्याची व्यवस्था करावी.
७. कक्षाधिकारी (मॅनेजमेंट/लॉ)
८. केंद्रप्रमुख, अहमदनगर, संगमनेर व नाशिक उपकेंद्र